आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२८जून २०२६ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- समुद्रापासून आकाशापर्यंत देश अधिक सुरक्षित आणि आत्मनिर्भर होत असल्याचं प्रधानमंत्र्यांचं मन की बात मधे प्रतिपादन/ गणेशोत्सवात प्लास्टर ऑफ पॅरिस ऐवजी मातीच्या स्थानिक मूर्ती खरेदी करण्याचं केलं आवाहन

- सेशेल्सचे अध्यक्ष पॅट्रिक हर्मिनी यांच्याशी मोदी यांची द्विपक्षीय चर्चा सुरु

- अमेरिका आणि इराण यांच्यातला युद्धविराम फिसकटल्यानं पश्चिम आशियात पुन्हा तणाव

**आणि**

- अमिस्ताद मोहिमे अंतर्गत भारताकडून व्हेनेझुएलाकडे मदत रवाना/ व्हेनेझुएलात आजही भूकंपाचा धक्का

**<><><><><>**

भारत आज समुद्रापासून आकाशापर्यंत अधिक सुरक्षित आणिआत्मनिर्भर होत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमाच्या एकशे पस्तीसाव्या  भागातून ते देशोदेशीच्या श्रोत्यांशी बोलत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच त्यांनी जून महिन्यात विविध क्षेत्रात देशानं साध्य केलेल्या ऐतिहासिक यशाचा आढावा घेतला.

कोलकात्यात झालेल्या कार्यक्रमात आयएनएस दुनागिरी, आयएनएस संशोधक आणि आयएनएस अग्रय ही अद्ययावत जहाजं भारतीय नौदलाच्या ताफ्यात समारंभपूर्वक सामील झाल्याबद्दल त्यांनी सांगितलं. या जहाजांच्या आरेखनापासून ते निर्मितीपर्यंत सर्व काही स्वदेशी असल्याची बाब त्यांनी अधोरेखित केली. जून महिन्यातच सी-295 या स्वदेशनिर्मित विमानानं आपलं पहिलं उड्डाण केल्याचं ते म्हणाले. सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्र तसंच हवाई अंतराळ क्षेत्राला नवं बळ मिळू लागलं आहे, रोजगाराच्या संधी वाढत आहेत आणि आत्मनिर्भर भारताचा संकल्प अधिक दृढ होत आहे असं ते म्हणाले. याच महिन्यात संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेनं स्वदेशनिर्मित लांब पल्ल्याच्या जमिनीवर मारा करू शकणाऱ्या क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केल्याची माहिती त्यांनी दिली.

जगभरात आंतरराष्ट्रीय योग दिनाचं यशस्वी आयोजन झाल्याबद्दल समाधआन व्यक्त करत  त्यांनी सांगितलं, परदेशात अडीच हजारापेक्षा जास्त ठिकाणी योगाभ्यास करण्यात आला. देशातही कोट्यवधींनी झालेल्या योग विषयक कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतल्याचंही त्यांनी सांगितलं. अहमदाबाद इथं झालेल्या जागतिक योगासन स्पर्धेत भारतानं १०२ सुवर्णपदकांसह एकूण ११४ पदकं जिंकल्याबद्दल त्यांनी विजयी खेळाडूंचं अभिनंदनही केलं. जेव्हा एखाद्या देशातली जनता संकल्प करते, तेव्हा कोणतीही शक्ती त्यांना त्यांच्या ध्येयापासून परावृत्त करू शकत नाही असं ते म्हणाले. राष्ट्रउभारणीतली लोकसहभागाची ताकद ही भारताची सर्वात मोठी संपत्ती आहे,  आणि अशा आयोजनातून आपण या लोकसहभागाचा पुन्हा पुन्हा अनुभव घेत असल्याची भावनाही त्यांनी व्यक्त केली.

पश्चिम आशियातल्या युद्धाच्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, आपण देशवासियांना केलेल्या आवाहनाला मोठा प्रतिसाद मिळाल्याचं त्यांनी सांगितलं. नागरिकांकडून मिळत असलेल्या सहकार्याबद्दल प्रधानमंत्र्यांनी आभारही व्यक्त केले. अनेक कुटुंबांनी सोनं खरेदी टाळल्याची, तसंच आपले परदेश दौरे पुढे ढकलल्याची माहिती त्यांनी दिली. यासोबतच देशवासीय पेट्रोल आणि डिझेलची बचत करत असून, शेतीत नैसर्गिक खतांच्या वापरात मोठी वाढ झाल्याचा उल्लेखही त्यांनी केला. लोकसहभागाची हीच ताकद आपल्याला बळकटी देईल आणि यशस्वी करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

समाजातल्या अंधश्रद्धेच्या धोक्यांचा उल्लेखही प्रधानमंत्र्यांनी आजच्या मन की बात मध्ये केला. अंधश्रद्धेमुळं भीती निर्माण होते, माणूस सत्य पाहणं थांबवतो, याची जाणीव त्यांनी करून दिली. विज्ञान, अनुभव आणि तर्काच्या आधारे अंधश्रद्धेला आव्हान देणाऱ्या पूर्णिमा देवी बर्मन यांचं प्रेरणादायी उदाहरणही त्यांनी श्रोत्यांसमोर मांडलं. त्यांच्या प्रयत्नांमुळेच पर्यावरण स्वच्छ ठेवण्यास मदत करणारा मात्र आसाममध्ये काही ठिकाणी अशुभ मानला जाणारा हरगिल हा दुर्मिळ पक्षी कशा रीतीनं अनेक गावांचं प्रतीक बनला, याबद्दल त्यांनी सांगितलं. ज्यावेळी समाजापर्यंत अचूक माहिती दिली जाते, तेव्हा जुनाट विचारांतही बदल घडून येतात, असं ते म्हणाले.

देशात क्रीडा संस्कृतीचा विस्तार, तंत्रज्ञानाच्या काळात लोकांची सर्जनशीलता टिकवून ठेवण्यासाठी, तंत्रज्ञानासोबतच आपल्या मुळांशी जोडलेलं राहण्यासाठी होत असलेला प्रयत्न, भारतीय संस्कृतीचा जगभरात होत असलेला प्रसार, पर्यावरण संवर्धन आणि

स्वच्छतेसाठी देशभरात केले जात असलेले प्रयत्न याबाबतची उदाहरणंही त्यांनी श्रोत्यांना सांगितली.

आगामी गणेशोत्सवात प्लास्टर ऑफ पॅरिसपासून बनलेल्या मूर्ती खरेदी करू नयेत असं आवाहन त्यांनी केलं.

**..... होल्ड - बाईट - - - -**

मातीच्या मूर्ती पाण्यात सहजपणे विरघळत असल्यानं आपले जलस्त्रोत आणि पर्यावरणाचं रक्षण होतं, आणि त्यासोबतच आपली श्रद्धाही टिकून राहते असं ते म्हणाले.

गणपतीची मूर्ती खरेदी करताना स्थानिक मूर्तिकारांनी तयार केलेल्या मूर्ती खरेदी करून व्होकल फॉर लोकलचा संकल्प अधिक दृढ करावा असं आवाहनही त्यांनी या निमित्तानं केलं.

सध्या सुरु असलेल्या पावसाच्या हंगामात कॅच द रेन या अभियानाअंतर्गत पावसाचा प्रत्येक थेंब वाचवण्याचं आवाहनही त्यांनी केलं.

**<><><><><>**

'विकसित भारत २०४७' हे स्वप्न साकार करण्यासाठी खेड्यांचा विकास केंद्रस्थानी असल्याचं केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हटलं आहे. विकसित भारत ग्रामीण योजनेसाठी ग्रामविकास मंत्रालयानं राज्यसरकारांच्या सहकार्यानं एक लाख ५१ हजार कोटी रुपयांहून अधिक तरतूद केल्याची माहिती राष्ट्रीय ग्रामीण विकास संमेलनात बोलताना त्यांनी दिली. ग्रामीण उपजीविका अभियानांतर्गत १० कोटींहून अधिक महिला बचत गटांशी जोडल्या गेल्याचं त्यांनी सांगितलं. प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेमुळे ग्रामीण रस्ते आणि पायाभूत सुविधा मोठ्या प्रमाणात सुधारल्याचाही त्यांनी उल्लेख केला

**<><><><><>**

माजी प्रधानमंत्री दिवंगत पी व्ही नरसिंह राव यांच्या जयंतीनिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आदरांजली वाहिली आहे. देशाच्या इतिहासातल्या एका अत्यंत कठीण कालखंडात नरसिंह राव यांनी देशाच्या प्रगतीमध्ये महत्वपूर्ण आणि शाश्वत योगदान दिलं, असं त्यांनी म्हटलं आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनीही पी व्ही नरसिंह राव यांना जयंतीनिमित्त आदरांजली वाहिली असून नरसिंह राव यांचं भारताच्या आर्थिक प्रवासातलं योगदान उल्लेखनीय असल्याचं नमूद केलं आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची सेशेल्सचे अध्यक्ष पॅट्रिक हर्मिनी यांच्याशी चर्चा सुरु आहे. दोन्ही नेते द्विपक्षीय सहकार्याच्या विविध पैलूंचा आढावा घेत असून परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर विचार-विनिमय करत आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना आज सेशेल्सची राजधानी व्हिक्टोरिया इथं पारंपरिक मानवंदना देण्यात आली.

सेशेल्सच्या नॅशनल असेंब्लीला आज मोदी संबोधित करणार असून तिथल्या भारतीय समुदायाशी ते संवाद साधणार आहेत. त्यानंतर, 'रोश कैमान' इथे होणाऱ्या सेशेल्सच्या राष्ट्रीय दिन सोहळ्याला मोदी उपस्थित राहतील. या सोहळ्यात भारतीय संरक्षण दलाचं एक पथक आणि भारतीय नौदलाची दोन जहाजं देखील सहभागी होणार असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं सांगितलं आहे. सेशेल्सच्या 'नॅशनल डे'च्या सुवर्णमहोत्सवी सोहळ्याला सन्माननीय अतिथी' म्हणून उपस्थित राहण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सेशेल्सच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर आहेत.

<><><><><>

अमेरिका आणि इराण यांच्यातला युद्धविराम फिसकटल्यानं पश्चिम आशियातली सुरक्षा स्थिती पुन्हा एकदा बिकट झाली आहे. गेल्या काही तासांमध्ये दोन्ही बाजूंनी एकमेकांवर लष्करी हल्ले केले. इराणनं आपल्या व्यापारी तेलवाहू जहाजावर ड्रोन हल्ला केल्याचा आरोप करत अमेरिकेनंही होर्मुझ सामुद्रधुनीजवळ इराणच्या दहा लष्करी ठाण्यांवर हल्ला केला. त्यानंतर इराणनं कुवेत आणि बहारीनमधल्या अमेरिकेच्या लष्करी तळांवर क्षेपणास्त्र डागली.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला कडक शब्दांत इशारा दिला आहे. युध्दविरामाचं आणखी उल्लंघन केलं तर मोठं लष्करी प्रत्त्युत्तर दिलं जाईल, असं ते म्हणाले.

<><><><><>

व्हेनेझुएलामधे झालेल्या भूकंपाच्या पार्श्वभूमीवर अमिस्ताद मोहिमे अंतर्गत भारताने पाठवलेली मदत व्हेनेझुएला इथं पोहचली. भारताने पाठवलेलं मदत साहित्य, वैद्यकीय मदत यामुळे व्हेनेझुएलातल्या बचावकार्याला मदत होईल, असं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हणाले. व्हेनेझुएलामधे झालेल्या भुकंपामुळे मोठ्या प्रमाणात जीवितहानी, वित्तहानी झाली आहे. त्यामुळे भारताने हवाई दलाची दोन विमानं

मदतकार्य घेऊन शुक्रवारी पाठवली. तसंच बचावकार्याला मदत करण्यासाठी ४१ सदस्यांचं बचाव पथकही पाठवण्यात आलं आहे.

वेनेझुएलामधे आजही सकाळी अराग्वा किनाऱ्याजवळ भूकंपाचा धक्का जाणवला त्याची तीव्रता ५ पूर्णांक ६ दशांश रिक्टर नोंदली गेली. जपानमध्येही आज सकाळी पुन्हा एकदा भूकंपाचे धक्के जाणवले. या भूकंपाची तीव्रता रिक्टर स्केलवर ६पूर्णांक १ दशांश इतकी होती. कोणत्याही प्रकारचा सुनामीचा इशारा देण्यात आलेला नाही. तसेच, जीवित किंवा वित्तहानी झाल्याची माहिती समोर आलेली नाही.

<><><><>

'मेड इन इंडिया' ही नाममुद्रा म्हणजे देशाची प्रतिष्ठा, विश्वासार्हता आणि गुणवत्तेची हमी असल्याचं केंद्रीय वाणिज्यमंत्री पीयूष गोयल यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

गुणवत्ता ही केवळ उद्योग-व्यवसायाची मोजपट्टी नसून ती राष्ट्रीय जबाबदारी असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. भारतात तयार होणाऱ्या प्रत्येक उत्पादनातून देशाची प्रतिमा जगासमोर उभी राहात असल्यानं दर्जाबाबत कोणतीही तडजोड करता येणार नाही, असं ते म्हणाले.

<><><><>

ऑस्ट्रेलियामध्ये १६ वर्षांखालच्या मुलांसाठी समाज माध्यमांवर बंदी घातल्यानंतर काही कंपन्या त्याची अंमलबजावणी नीटपणे करत नसल्याचं उघड झालं असून ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बानीज यांनी अशा कंपन्यांवर दुप्पट दंड आकारण्याचा इशारा दिला आहे. त्यासंबंधीचं विधेयक येत्या आठवड्यात संसदेची हिवाळी सुट्टी सुरु होण्यापूर्वी सरकार मांडणार आहे.

<><><><>

वैद्यकीय उपकरणांना परवाने मिळवण्यासाठी लागणारा कालावधी कमी करण्याच्या दृष्टीने केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने वैद्यकीय उपकरणे नियम २०१७मध्ये सुधारणा सुचवल्या आहेत. त्यामध्ये रक्तदाब तपासणी मॉनिटर, पल्स ऑक्सिमीटर यासारख्या मध्यम श्रेणीतल्या उपकरणांना उत्पादन परवाना मिळवण्यासाठी लागणारा सध्याचा १४० दिवसांचा कालावधी ११५ दिवसांवर तर हृदयासाठीचा स्टेंट किंवा कृत्रिम सांधे यासारख्या उच्च श्रेणीतल्या

उपकरणांसाठी सध्याची १०५ दिवसांची कालमर्यादा ९० दिवसांवर आणावी असं सुचवलं आहे.

**//<><><><><>//**